Pune Police

# प्रेस नोट

दि.२७/०७/२०१७

## ऑनलाईन गणेशोत्सव परवाना प्रक्रिया २०१७

➢ प्रस्तावना :-

पुणे शहर हे भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक दृष्टया महत्वाचे शहर आहे. देशात सर्वप्रथम सावर्जनिक गणेशोत्सवाची सुरुवात पुणे शहरात झाली. पुणे शहरामध्ये गणेशोत्सव हा मोठया प्रमाणात उत्साहाने साजरा केला जातो. पुणे शहरालगतचा काही नवीन भाग हा पुणे आयुक्तालयाचे परिक्षेत्रात समाविष्ट झाल्याने शहराचा विस्तार हा वाढला आहे. त्यामुळे पुणे आयुक्तालयाचे अंतर्गत सार्वजनिक गणेशोत्सव साजरे करणा-या मंडळांमध्ये पर्यायाने वाढ झालेली आहेत. पुणे शहरात नोंदणीकृत मंडळे २८९१, बिगर नोंदणीकृत मंडळे १६८८ असे मिळून सुमारे ४५७९ सार्वजनिक गणेश मंडळे आहेत. चालुवर्षी गणपती उत्सव हा दि.२५/०८/२०१७ ते दि.०५/०९/२०१७ या कालावधीत साजरा होणार आहे.

सावर्जनिक गणेशोत्सव साजरे करणारे मंडळाना यापुर्वी दरवर्षी विविध परवाने मिळविण्यासाठी उदा. वाहतुक विभाग, स्थानिक पोलीस स्टेशन तसेच महानगरपालिका इ. यांच्याकडील वेगवेगळया कार्यालयामध्ये जावे लागते. त्यामुळे मंडळांची त्यामध्ये गैरसोय होवुन वेळेचा अपव्यय होतो.

पुणे शहर पोलीस आयुक्त श्रीमती रश्मी शुक्ला यांचे कल्पनेतुन पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सहयोगाने सार्वजनिक गणपती मंडळाना आवश्यक असणारे परवाने देणेकरीता यावर्षी ऑनलाईन परवाना देण्याची प्रक्रिया प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात येत आहे. त्यामुळे सार्वजनिक गणपती मंडळांना पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वाहतुक विभाग, पोलीस स्टेशनकडील परवाना मिळणे सुलभ व सोयीस्कर होणार आहे. त्याचबरोबर दरवर्षी प्रमाणे ऑफलाईन परवाना देण्याची प्रक्रिया देखील चालु राहणार आहे. पुणे पोलीस वेबसाईट **www.punepolice.co.in** वर हा टॅब देण्यात येणार आहे.

➢ उददीष्टे व वैशिष्टये :-

- महाराष्ट्रात प्रथमच अशी प्रणाली पुणे पोलिसांच्या वतीने सुरु करण्यात येत आहे.
- गणेश मंडळाना परवाना मिळवण्याची प्रक्रिया सुलभ,सोपी,गतिमान होणार आहे.
- सर्व वाहतुक विभाग, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व क्षेत्रीय कार्यालये,सर्व पोलीस स्टेशन एकत्रित जोडण्यात आलेली आहे. त्यामुळे या कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष न जाता ऑनलाईन परवाना प्राप्त होणार आहे.
- ऑनलाईन गणेश मंडळ परवाना अर्ज सादर केल्यावर टप्याटप्याने वेगवेगळ्या कार्यालयांकडे ऑनलाईन वर्ग करण्यात येईल. प्रत्येक टप्यावर अर्जाची सदयस्थिती अर्जदारास एसएमएस व्दारे प्राप्त होणार आहे.



PuneCityPolice/WebSite/ PAGE No. 1

Pune Police

- सदर परवाना प्रक्रिया एक खिडकी योजनेप्रमाणेच ही Virtual singal window प्रणाली उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
- प्रायोगिक तत्वावर ही प्रणाली सुरु करण्यात आलेली असल्याने मंडळांना ऑनलाईन किंवा ऑफलाईन दोन्ही पैकी एकाच ठिकाणी अर्ज करता येईल.
- गणेशोत्सव संदर्भात शासन/पोलीस/महानगरपालिका/न्यायालये मार्गदर्शक सुचना/ शासन निर्णय/ न्यायनिवाडे/ आचार संहिता इ. उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. ऑनलाईन अर्ज भरताना त्याचे काळजीपुर्वक वाचन करुन सदर नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.
- संबंधित विभागाने परवानगी दिली अगर नाकारली याची देखील माहिती ईमेल द्वारे प्राप्त होणार आहे.
- सर्व प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पोलीस विभागाकडुन ऑनलाईन अंतिम परवाना संबंधितांचे ईमेल वर प्राप्त होणार आहे.
- गणेशोत्सव मंडळांनी रनिंग मंडप व कमानीच्या परवानगी करिता महानगरपालिकेत रकमेचा भरणा करावयाचा असल्याने त्याचे परवानगी करिता ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करावा.

➢ मंडळाकडे आवश्यक असणारे कागदपत्रे :-

- मंडळाची संपुर्ण माहिती (नाव, पत्ता, नोंदणी क्र.)
- मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव/सरचिटणीस, खजिनदार यांची माहिती (नाव, पत्ता, ईमेल, मोबाईल क्रमांक, फोटो)
- मंडप माहिती (ठिकाण, आकार)
- सर्व ठेकेदारांची माहिती (मंडप, विद्युत, ध्वनीक्षेपक, वाहन)
- स्थापना मिरवणुक माहिती (मार्ग, दिनांक, वेळ, वाहन, वाद्यपथके, जनसमुदाय)
- विसर्जन मिरवणुक माहिती (मार्ग, दिनांक, वेळ, वाहन, वाद्यपथके, जनसमुदाय)
- मागील वर्षीचे परवाने/प्रमाणपत्र



PuneCityPolice/WebSite/ PAGE No. 2

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
Pune Police
सत्यमेव जयते













